# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

वाराणसी आता केवळ प्राचीन शहर राहीलं नसून, प्रगतीचं एक मॉडेल झालं असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. वाराणसीमध्ये आज तीन हजार ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. काशीमध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, धार्मिक पर्यटनाला चालना मिळत असल्याचं सांगून त्यांनी शहराच्या जलद विकासावर प्रकाश टाकला.

वीज पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी पंतप्रधान वाराणसी विभागातल्या जौनपूर, चंदौली आणि गाजीपूर जिल्ह्यांमध्ये प्रकल्पांचं उद्घाटन करतील. त्यानंतर ते मध्य प्रदेशला जाणार असून, इसागढ इथल्या गुरुजी महाराज मंदिरात दर्शन घेऊन पूजा करतील. तसंच ते आनंदपूर धाम इथं एका सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. आनंदपूर धामची स्थापना आध्यात्मिक आणि सामाजिक सेवेच्या उद्देशांसाठी करण्यात आली आहे. ३१५ हेक्टर क्षेत्रफळावर वसलेल्या या मंदिरात ५०० हून अधिक गायी असलेली आधुनिक गोशाळा आहे.

****

केंद्र सरकार अंमली पदार्थ उत्पादकांचं जाळ उध्वस्त करण्यासाठी प्रयत्न करत असून, संबंधित संस्थांवर कठोर कारवाई करत असल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. आसाममध्ये २४ कोटी ३२ लाख रुपये किमतीचे ३० किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. या कारवाईसाठी अंमली पदार्थ नियंत्रण मंडळ, आसाम पोलीस आणि केंद्रिय राखीव पोलीस दलाचं शहा यांनी अभिनंदन केलं आहे.

****

नवीन डेटा संरक्षण नियमांतर्गत आरटीआय म्हणजेच माहितीच्या अधिकाराखाली खुलासे सुरूच राहतील, असं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. समाजमाध्यमांवर काँग्रेस नेते जयराम रमेश यांच्या पोस्टला उत्तर देताना वैष्णव यांनी ही माहिती दिली. नवीन डेटा संरक्षण नियम माहिती उघड करण्यास प्रतिबंधित करणार नाही, तर व्यक्तींच्या गोपनीयतेचे अधिकार बळकट करणं आणि कायद्याचा संभाव्य गैरवापर रोखणं हा नव्या नियमांचा उद्देश आहे असं वैष्णव यांनी सांगितलं.

****

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली आहे. महात्मा फुले हे मानवतेचे खरे सेवक होते, त्यांनी समाजातील शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित केलं. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं.

पवार यांनी आज सकाळी पुण्यात फुलेवाड्याला भेट देऊन महात्मा फुले यांना अभिवादन केलं. फुले वाड्यात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या भव्य स्मारकासाठी आजूबाजूची जमीन मिळावी यासाठी सरकार प्रयत्न करत असून, यासाठी अनेकजण तयार झाले आहेत, यासाठी सरकारनं यापूर्वीचं २०० कोटी रुपयांची तरतूद करून ठेवली असल्याचं त्यांनी सांगितलं. जमीनी देणाऱ्यांचं योग्य आणि चांगल्या ठिकाणी पुनवर्सन करण्यात येईल, अशी ग्वाही देखील पवार यांनी दिली.

****

केंद्र सरकारच्या पंचायत राज मंत्रालयामार्फत २०२२-२३ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या पंचायत प्रगती निर्देशांकात, नांदेड जिल्ह्याने उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. राज्यातल्या पहिल्या २५ ग्रामपंचायतींच्या यादीमध्ये तब्बल नऊ ग्रामपंचायती नांदेड जिल्ह्यातल्या असून, हिमायतनगर तालुक्यातल्या जवळगाव ग्रामपंचायतीने ८० पूर्णांक २१ गुणांसह राज्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्यातल्या यशस्वी ग्रामपंचायतींमध्ये हिमायतनगर तालुक्यातल्या जवळगाव,

पळसपूर, खडकी, विरसानी, एकघरी, पारडी तसच भोकर तालुक्यातल्या नारवट तर माहूर तालुक्यातील लांजी आणि तुलसी ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

****

अमेरिकेत फ्लोरिडा इथं सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारताचा धीरज बोम्मादेवरा, अतनु दास आणि तरुणदीप राय यांचा रिकर्व संघ अंतिम फेरीत दाखल झाला आहे. काल उपान्त्य फेरीत या संघाने स्पेनचा सहा – दोन असा पराभव केला. अंतिम फेरीत भारतीय संघाचा सामना येत्या रविवारी चीन सोबत होणार आहे.

****

इंडियन प्रिमियर लीग – आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स संघात सामना होणार आहे. चेन्नई इथं संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. या स्पर्धेत गुणतालिकेत गुजरात टायटन्सचा संघ पाचपैकी चार सामने जिंकून आठ गुणांसह पहिल्या स्थानावर, तर तीन सामने जिंकून सहा गुण पटकावलेला दिल्ली कॅपिटल्सचा संघ दुसऱ्या क्रमांकावर आहे.

****

मराठवाड्यात तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. उद्या कोकणासह मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून काही ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****